पुण्यनगरी दि 05/03/2023

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा छडा

## ५ जणांविरुद्ध गुन्हा; दोघे जण जेरबंद

**नांदेड/ प्रतिनिधी**

दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या एका टोळीतील दोघांना सोनखेड पोलिसांनी जेरबंद केले तर तिघे जण फरार झाले आहेत असे पोलिसांनी सांगितले.

सोनखेड पोलिसांचे पथक शनिवारी पहाटे गस्तीवर होते. त्यावेळी नांदेड ते सोनखेड मार्गावर निसर्ग धाब्याच्या मागे काही जण सशस्त्र दरोडा टाकण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची खातरजमा करीत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, इतवारा विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.सिध्देश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोनखेड पोलिस ठाण्याचे सपोनि विशाल भोसले, पोलीस अंमलदार मधुकर मोरे,जीप चालक नागरगोजे व होमगार्ड सुनील मोरे यांनी पहाटे ३ वाजता त्या ठिकाणी छापा टाकून दरोड्याच्या तयारीत असलेले ५ जण आढळून आले त्यात ऑटोचालक यश राजूसिंह कौशिक (१९,रा.ग्रामीण पॉलिटेक्नीक कॉलेजच्या मागे,नांदेड), रोशन गोपाळ पद्मवार (१९, मिस्त्रीकाम रा. सगरोळी ता. बिलोली ह.मु. विष्णुपुरी काळेश्वर कमानीजवळ नांदेड), रोहित विजयकुमार कदम (रा.जि.प. शाळेच्या पाठीमागे विष्णुपुरी,नांदेड), संतोष किशन कंधारे (रा.नवी आबादी जि.प. शाळेच्या अलिकडे विष्णुपुरी नांदेड, रोहित कदमचा मित्र नाव,गाव माहित नाही यांचा समावेश आहे. यापैकी दोघे ताब्यात असून अन्य फरार आहेत. ही टोळी नांदेड ते लोहा राष्ट्रीय महामार्गावरून येणारी,जाणारी वाहने अडवून वाहनातील प्रवासी, दुचाकीस्वारांकडून मोबाईल, रोकड रक्कम, दागिने लुटण्याच्या तयारीत होती. घटनास्थळावरुन ऑटोरिक्षा, लोखंडी रॉड,तलवार, दोरी आदी साहित्य जप्त करण्यात आले. त्यांच्याविरुध्द सोनखेड ठाण्यात भादंवि कलम ३९९,४०२ दाखल करण्यात आला आहे. दोघे जण ताब्यात तर तिघे फरार असल्याचे उपनिरीक्षक परिहार यांनी सांगितले.